# "शुध्दीपत्रक"

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने विविध विषयातील अधिव्याख्याता, शासकीय कला संस्था, महाराष्ट्र कला शिक्षण सेवा गट-अ या पदांसाठी मागणीपत्र आयोगास पाठविले होते. त्याअनुषंगाने आयोगाकडुन संबंधित विषयाकरिता जाहिरात क्रमांक १७ ते २४/२०१६, दिनांक१३/०४/२०१६ व २८/२०१६,दिनांक ११/०५/२०१६ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. सदर जाहिरातींच्या अनुषंगाने उमेदवारांकडून online अर्ज आयोगास प्राप्त झाले आहेत. आता शासनाने W.P.६३५८/२०१६ या प्रकरणी मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या **अंतरिम** आदेशाच्या अनुषंगाने खालील विषयांच्या मागणीपत्रातील पदसंख्येत बदल करुन सुधारित पदसंख्या आयोगाला कळविली असून ती खालीलप्रमाणे आहे.

| जाहिरात क्रमांक | विषय | एकूण पदे | खुला | अ.जा | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८/२०१६ | उपयोजित कला | १०+१■ | ४+१*+१☑ | -- | १+१* | १ | -- | १ | -- | -- | १■ |
| | | एकूण १० पदांपैकी १ पद अपंग चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू याकरीता आरक्षित | | | | | | | | | |
| २०/२०१६ | कला शिक्षक प्रशिक्षण | १■ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १■ |
| २१/२०१६ | कला व हस्तव्यवसाय वस्त्रकला विभाग | ५ | २+१* | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | १* |
| २३/२०१६ | कला व हस्तव्यवसाय धातुकाम | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

(* उपलब्ध असल्यास महिलांकरीता आरक्षित, ☑अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी आरक्षित, ■अनुशेषाची पदे)

शासनाने वरीलप्रमाणे कळविल्यानुसार वरील ४ विषयाच्या सुधारित पदसंख्येचे आरक्षण विचारात घेऊन सदर पदाच्या निवडप्रक्रियेची कार्यवाही आयोगाकडून करण्यात येईल. याव्यतिरिक्त **जाहिरात क्रमांक २२/२०१६ कला व हस्तव्यवसाय अंतर्गत गृहसजावट** व **जाहिरात क्रमांक २४/२०१६ कला व हस्तव्यवसाय मातकाम** या विषयाकरीता पुर्वी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीतील पदांमध्ये बदल नाही.

तसेच खालील तीन विषयांकरिता **सुधारीत पदसंख्येबाबत** शासनाचे अभिप्राय अद्याप प्राप्त झाले नाहीत. प्राप्त झाल्यानंतर त्यासंदर्भात सदर बदलाबाबतची घोषणा स्वतंत्ररीत्या प्रसिध्द करण्यात येईल, याची संबंधित उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

| |
|---|
| **जाहिरात क्रमांक १७**/२०१६- रेखा व रंगकला . |
| **जाहिरात क्रमांक** १९/२०१६- शिल्पकला व प्रतिमानबंध. |
| **जाहिरात क्रमांक** २८/२०१६- कलेचा इतिहास . |

स.पां.देशमुख
अवर सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग